



RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक निडर निर्भिड

# जनसंचलन

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784






वर्ष ३ रे | अंक : २१२ वा सोमवार दि १३ ऑक्टोंबर २०२५ पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# जिल्हा रुग्णालयात पेयजल नसल्याने रुग्णांचे हाल!

## तरुणांनी पुकारले बैठा आंदोलन! तत्कालीन अधिकारी गौरकर यांनी केला होता पाणीउपाय योजनेत लाखोंचा भ्रष्टाचार?

**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्हा सामान्य रुग्णालयात पिण्याच्या पाण्याची सार्वजनिक व्यवस्था अपेक्षित असताना व त्यासाठी फिल्टर व इतर उपकरणांसाठी लाखोंचा खर्च करण्यात आलेला असताना सुद्धा बारामाही लोकांना तहान भागवण्यासाठी विकतचे बाटलीतील पाणी घेऊन आर्थिक भुर्दंड सोसावा लागत असल्याचे दुर्दैवी चित्र आहे. त्यामुळे येथे आज तरुणांनी बैठे आंदोलन सुरू केले असून,केंद्रीय मंत्र्यांचा जिल्हा असल्यावरही एकही लोकप्रतिनिधी अद्याप आंदोलनस्थळी फिरकला नाही. त्यामुळे आंदोलनकर्त्यांनी ठाम भूमिका घेतली आहे. जोपर्यंत पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध होत नाही तोपर्यंत आंदोलनातून उठणार नाही अशी भूमिका तरुणांनी घेतली आहे. जिल्हा सरकारी रुग्णालयामध्ये पुरशा प्रमाणात पाण्याची व्यवस्था नसल्याने, रुग्णांसह नातेवाइकांना त्रास सहन करावा लागत आहे. सरकारी रुग्णालयामध्ये येणारे रुग्ण हे आर्थिकदृष्ट्या सक्षम नसतात, त्यामुळे त्यांना सरकारी रुग्णालयामध्ये उपचार करून घ्यावे लागतात; परंतु सरकार आणि प्रशासन आवश्यक सुविधा देण्यास कमी पडत असल्याचे दिसून येते. या रुग्णालयामध्ये गरीब रुग्ण येत असल्याने विविध समस्यांकडे गांभीर्याने पाहिले जात नसल्याचा आरोप करण्यात येत आहे. शासकीय रुग्णालयामध्ये जिल्ह्यातून लोक तपासणी व उपचारासाठी येतात, त्यामुळे त्या ठिकाणी सर्व सुविधा असणे हे गरजेचे असते. किमान पिण्याची पाण्याची सोय निर्माण करुन देणे रुग्णालयाची जबाबदारी आहे. **पाण्यासाठीचे जिल्हाधिकाऱ्यांनी त्वरित मंजुरात केलेले ३६ लाख गेले कुठे?** सार्वजनिक बांधकाम विद्युत विभागात शासकीय कामातच लाखो रुपयांचा भ्रष्टाचार जिल्हा सामान्य रुग्णालय बुलढाणा येथे उन्हाळ्यात बुलढाणा जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी विजिट दिली असता त्या ठिकाणी त्यांना काही रुग्ण पिण्याच्या पाण्यापासून वंचित झालेले दिसून आलेत त्यांनी चौकशी केली असता सामान्य रुग्णालय येथे पिण्याच्या पाण्याची सोय नसून आम्हाला पाण्यासाठी वन वन फिरावं लागते नाही तर पाणी विकत घ्यावे लागते अशी परिस्थिती जिल्हाधिकारी यांच्या लक्षात आणून दिली. त्याच



वेळेस जिल्हाधिकारी यांनी सार्वजनिक बांधकाम विद्युत विभागाचे तत्कालीन अधिकारी गौरकर यांना बोलावून त्वरीत मंजुरात देऊन ३६ लाख रुपये सामान्य रुग्णालयात पिण्याच्या पाण्याकरीता मंजुरात केली व जिल्हा सामान्य रुग्णालयात पिण्याच्या पाण्याची कोणासही टंचाई जाणार नाही याची दक्षता देऊन त्वरित काम सुरू करण्यास सांगितले परंतु गौरकर यांनी जिल्हाधिकारी यांच्या आदेशालाही केराची टोपली दाखविली त्यांनी जिल्हा सामान्य रुग्णालयात आरो प्लांट लावण्यास भरपूर कालावधी घेतला व तोही निकृष्ट दर्जेचा लावला जो कधी चालते कधीच बंद पडते याव्यतिरिक्त त्यांनी प्रत्येक वार्डामध्ये पिण्याच्या पाण्याचे एक एक हजार लिटरच्या टाक्या लावल्या परंतु त्यातही पाणी जात नाही पाणी आरोमध्ये शुद्ध होत नाही थंड होत नाही त्यांनी नाही त्या ठिकाणी तो निकृष्टदर्जेचा आरो प्लांट लावून ठेवलेला जिथे घाणच घाण आहे त्यांना या पाण्याविषयी बऱ्याच वेळा सिटी न्यूज दैनिक जनसंचालन यांनी पाठपुरावा करून तत्कालीन जिल्हा शल्य चिकित्सक व जिल्हाधिकारी यांच्या निर्दशनास आणून दिले परंतु सार्वजनिक बांधकाम विद्युत विभागाचे तत्कालीन अधिकारी गौरकर यांनी वर्क ऑर्डर नुसार काम न करता निकृष्ट दर्जेचा आरो प्लांट लावून लाखो रुपयांचा भ्रष्टाचार केला व आज काही संघटनेचे मंडळी रुग्णांना व त्यांच्या नातेवाईकांना पिण्याचे पाण्याची गैरहत असल्याने जवळपास बऱ्याच दिवसांपासून त्रस्त आहेत आज तेथे काही संघटनानी आंदोलन छेडले, तरीही हे कुंभकर्णी झोपेत असलेले आरोग्य विभाग यांना जाग आली नाही जिल्हा सामान्य रुग्णालयाचे अशी परिस्थिती झालेली आहे.आंधळे दळतात आणि कुत्रे पिठ खातात!

# स्थानिक स्वराज्य निवडणूकीचा निर्णय आता स्थानिक पातळीवरचं?...

**जनसंचलन/बुलढाणा**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी युती करण्या संदर्भात आम्ही स्थानिक पातळीवर निर्णय घेण्याचे अधिकार दिले आहेत. पण, ज्या ठिकाणी शक्य आहे, तिथे युती केली पाहिजे, अशा प्रकारच्या सूचना मुख्यमंत्र्यांनी दिल्या आहेत. तसेच एखाद्या ठिकाणी युती झाली नाही, तरी मित्र पक्षांवर टीका करू नये, अशा प्रकारचे निर्देश देण्यात आले आहेत. महायुती म्हणून या निवडणुकांमध्ये चांगले यश तीनही पक्षांना मिळेल, हा विश्वास आम्हाला आहे. स्वबळावर निवडणुका लढण्याची कार्यकर्त्यांची इच्छा नेहमीच असते. परंतु, स्थानिक परिस्थितीचा विचार करून निर्णय घ्यायचा असतो. केवळ सगळ्यांना निवडणूक लढता यावी, एवढा मर्यादित निर्णय घेता येणार नाही, ज्या ठिकाणी शक्य आहे, त्या ठिकाणी मित्र पक्षांसोबत युती करूनच निवडणूक लढविली जाईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले. देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत आज अमरावतीत पश्चिम विदर्भ स्थानिक स्वराज्य संस्था आणि शिक्षक मतदारसंघ निवडणूक पूर्वतयारी पदाधिकारी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते, यावेळी त्यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधला. देवेंद्र फडणवीस म्हणाले, भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी संपूर्ण राज्यात विभागनिहाय बैठकांचे नियोजन केले आहे. महापालिका, जिल्हा परिषदा, नगर पालिका, नगर पंचायती यांच्या निवडणुकांच्या निमित्ताने आढावा घेण्यासाठी या बैठका घेण्यात येत आहेत. यापुर्वी मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, कोकण आणि पश्चिम महाराष्ट्र अशा चार विभागांचा आढावा घेण्यात आला आहे. आज अमरावती आणि नागपूर विभागाचा आढावा घेण्यात येत आहे. पुढील आठवड्यात मुंबई महापालिकेच्या निवडणुकीच्या संदर्भात आढावा बैठक आयोजित करण्यात येणार आहे. कार्यकर्त्यांची मानसिकता आणि तयारी चांगली आहे. निवडणुकीसाठी यंत्रणा म्हणून पक्ष सज्ज आहे. कार्यकर्त्यांना दिशानिर्देश देऊन या निवडणुका जिंकण्यासाठी वातावरण निर्मिती करण्याचा आमचा प्रयत्न आहे. दरम्यान प्रभाग क्रं १४




मध्ये काल शिवसेना व भाजप या दोन्ही पक्षाचा कार्यक्रम होता. मात्र एकमेकांच्या कार्यक्रमात शिवसेना किंवा भाजपाचे कार्यकर्ते दिसून आले नाहीत. त्यामुळे भाजप आणि शिवसेना वेगवेगळी लढाई लढणार असल्याचेसंकेतमिळतआहे.

# मनस्तापाचा प्रवेश फेरा...

## संपादकीय लेख

दहावीचा निकाल जाहीर होऊन अडीच महिने लोटून गेल्यावरही अकरावी प्रवेशाचा घोळ संपण्याचे नाव घेत नाही. सरकारने यंदा प्रथमच लागू केलेल्या राज्यव्यापी केंद्रीय ऑनलाइन प्रवेशप्रक्रियेच्या फ ेऱ्यांचा फेरा अजूनही सुरूच आहे. एकीकडे अनेक कनिष्ठ महाविद्यालयांमधील जागा रिक्त दिसतात; तर दुसरीकडे काही लाख विद्यार्थी अजूनही प्रवेशाच्या प्रतीक्षेत आहेत. हजारो विद्यार्थी-पालकांच्या डोक्यावर प्रवेश कोठे मिळणार, या प्रश्नाची टांगती तलवार उभी आहे. कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये अकरावीचे वर्ग सुरू झाले, तरी प्रवेशाअभावी अनेक विद्यार्थ्यांना त्याचा उपयोग होत नसल्याचे दिसून येत आहे. अभ्यासक्रमाचा महत्त्वाचा वेळ वाया चालला आहे. आता गणेशोत्सव आणि पुढे दसरा-दिवाळीच्या सणासुदीच्या दिवसांत किती शैक्षणिक कामकाज होणार, हा प्रश्न आहे. त्यामुळे बहुतांश कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये पहिल्या शैक्षणिक सत्रातील अध्ययनाचे महत्त्वाचे दिवस केवळ सरकारी अट्टाहास आणि नियोजनशून्यतेमुळे वाया जाणार, असेच म्हणावे लागेल. अकरावीच्या वर्गांतील शैक्षणिक कामकाज वेळेत सुरू व्हावे, या उद्देशाने शालान्त परीक्षा मंडळाने यंदा नियोजनबद्ध पद्धतीने परीक्षा आणि निकालाची प्रक्रिया पूर्ण केली. त्यामुळे १३ मे रोजी, म्हणजे विक्रमी वेळेत दहावीचा निकाल जाहीर झाला. मात्र, शिक्षण विभागाने यंदा कोणाकडूनही मागणी करण्यात आलेली नसताना राज्यस्तरीय केंद्रीय प्रवेश परीक्षेची कल्पना पुढे आणली आणि त्याला ङ्गऑनलाइनफ प्रवेश सक्तीची जोड दिली. मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक आणि अमरावती अशा मोठ्या शहरांमध्ये ही पद्धत यशस्वी ठरली आहे; मात्र अगदी ५० विद्यार्थी असलेल्या गावांमध्येसुद्धा याच पद्धतीने प्रवेश प्रक्रिया राबवण्याचा अट्टाहास अंगाशी आला. पूर्वी दहावीची परीक्षा झाल्यानंतर विद्यार्थ्यांकडून अर्जांतील महत्त्वाची माहिती भरून घेण्यात येत असे. त्यामुळे निकालानंतर फक्त गुणांचा तपशील आणि महाविद्यालयांचे रकाने भरून अर्जपूर्ती होत असे; यंदा मात्र निकाल जाहीर झाल्यावरच ही प्रक्रिया सुरू झाल्याने अनेकांना अडचणींना सामोरे जावे लागले. अनेक गावांमध्ये वीजपुरवठ्याअभावी किंवा इंटरनेटची ङ्गरेंजफ नसल्याने अर्ज भरता येत नव्हते, अनेक विद्यार्थी आणि पालकांसह शिक्षकही या प्रक्रियेबाबत अनभिज्ञ होते. गोरगरीब विद्यार्थ्यांची लूटही सुरू झाली. मग तहान लागल्यावर विहीर खणल्याप्रमाणे, अडचणी येतील, तशी प्रक्रियेत बदल करण्याची मालिका सुरू झाली. विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार मार्गदर्शन केंद्रे सुरू झाली, गावांमध्ये शाळेत तुटपुंज्या संगणकांवर प्रवेशअर्ज भरण्यासाठी विद्यार्थ्यांच्या रांगा लागू लागल्या आणि ङ्गइनहाउस कोटाफ्बाबत तीव्र नाराजी व्यक्त झाल्यावर नियमांत बदलही करण्यात आले. हे काम सोपविलेल्या कंपनीस पुरेसा अनुभव नसल्याचेही लक्षात आले आहे. आता जुलै महिना संपला, तरी या प्रक्रियेचे कवित्व सुरूच आहे. फक्त मुंबईतच पावणेचार लाखांपैकी पावणेदोन लाख विद्यार्थी अजूनही प्रवेशाविना आहेत. काही महाविद्यालयांमध्ये वर्ग सुरू झाले असले, तरी प्रवेशाअभावी विद्यार्थ्यांना हजर राहता येत नाही, अशी स्थिती आहे. हे बुडलेले कामकाज अतिरिक्त वेळ देऊन भरून काढावे लागणार, असे दिसते. सरकारचे संबंधित विभाग पुढील फेऱ्यांच्या नवनव्या तारखा जाहीर करत आहेत.



सध्या प्रवेशाची सर्वांसाठी खुली फेरी (ओपन टू ऑल) सुरू असून पुरवणी परीक्षेतील विद्यार्थ्यांनाही त्याचा लाभ होऊ शकतो. मात्र, इथवर झालेल्या विलंबास जबाबदार कोण, हा प्रश्न बाकी राहतो. अकरावीच्या जागा या विद्यार्थीसंख्येच्या तुलनेत अतिरिक्त असल्याचे आढळून येत आहेत; तर दुसरीकडे महाविद्यालयांऐवजी बहिस्थ पद्धतीने शिक्षण, अकरावीऐवजी आयटीआय किंवा अन्य रोजगारक्षम अभ्यासक्रम पूर्ण करण्याकडेही विद्यार्थ्यांचा कल वाढताना दिसत आहे. तो लक्षात घेऊन पारंपरिक शिक्षणव्यवस्थेत काही बदल करता येतील का, याचाही विचार झाला पाहिजे. तसेच अकरावीला नामांकित महाविद्यालयांमध्येच प्रवेश हवा, हा विद्यार्थी-पालकांचा आग्रहसुद्धा या विलंबास काही प्रमाणात कारणीभूत आहे. एकुणात, त्वरेने निकालात कमावले, ते दिवस प्रवेश प्रक्रियेच्या घोळात गमावले, असेच यंदाचे चित्र आहे. किमान आता तरी कोणीही इच्छुक विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहणार नाही, हे पाहतानाच तातडीने प्रक्रिया पूर्ण करून विद्यार्थ्यांना वर्गात बसण्याची संधी द्यावी, एवढीच अपेक्षा.





The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# कोट्यवधींच्या फसवणुकीचा सूत्रधार राजू नेर्लेकर सापडला, कोल्हापूर पोलिसांची सर्वात मोठी कारवाई

वृत्तसंस्था/ कोल्हापूर

कोल्हापूर जिल्ह्यातील बहुचर्चित ङ्गझिप करंसीफ नावाच्या बनावट कंपनीच्या माध्यमातून नागरिकांची कोट्यावधी रुपयांची फसवणूक केल्याच्या प्रकरणात नवी अपडेट समोर आली आहे. हुपरी येथील राजेंद्र नेर्लेकर या आर्थिक फसवणुकीच्या प्रकरणातील मुख्य सूत्रधाराला पोलिसांनी अखेर बेड्या ठोकल्या आहेत. तब्बल दीड वर्षापासून फरार असलेल्या नेर्लेकर याला अखेर सोमवारी आर्थिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या विशेष पथकाने अटक केली आहे. जानेवारी २०२४ पासून फरार असलेल्या नेर्लेकरला आता इचलकरंजी न्यायालयाकडून पोलीस कोठडी मिळाली आहे. या कारवाईमुळे या गुन्ह्याच्या तपासात मोठं यश मिळाल्याचं समजलं जात आहे. राजेंद्र भीमराव नेर्लेकर (वय ४८, रा. शिवाजीनगर) याच्यावर महाराष्ट्रातील हुपरी, कोल्हापुरातील शाहूपुरी पोलीस ठाण्यात आणि आंध्रप्रदेशात मिळून एकूण १९ कोटी रुपयांच्या फसवणुकीचे गुन्हे दाखल आहेत. त्याने ङ्गझिप करंसीफ नावाच्या बनावट कंपनीच्या माध्यमातून तसेच विविध बनावट गुंतवणूक योजनेत लोकांना जास्त फायदा मिळवून देण्याचे आमिष दाखवून मोठ्या प्रमाणात फसवणूक केली आहे. योजनेच्या माध्यमातून अनेक गुंतवणूकदारांकडून पैसे घेण्यात आले होते. त्यातच हुपरी येथील एका जैन मुनींचा देखील समावेश आहे. याप्रकरणी मुनींसह अनेक गुंतवणूकदारांनी या फसवणुकीच्या निषेधार्थ नाराजी व्यक्त करून नेर्लेकर याच्या घरासमोर उपोषणही केले होते. कोल्हापूर जिल्ह्यातील आर्थिक गुन्हे अन्वेषण शाखेचे अधिकारी आणि स्थानिक पोलीस यांनी संपर्क ठेवून ही मोठी कारवाई यशस्वी केली आहे. आर्थिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या अधिकाऱ्यांनी सांगितले आहे की, फसवणुकीची व्याप्ती आणखी वाढण्याची शक्यता आहे, कारण अनेक नवीन तक्रारी सध्या मिळत आहेत. या प्रकरणाचा तपास व्यापक स्वरूपात चालू असून पुढील तपासासाठी विविध आर्थिक व्यवहारांची खोलवर तपासणी केली जाणार आहे. आर्थिक गुन्हे अन्वेषण विभागाने या प्रकरणात





वेगाने कारवाई करत नेर्लेकरला न्यायालयात हजर केले असून पुढील सुनावणीसाठी तपास सुरु आहे. दरम्यान, या कारवाईमुळे कोल्हापूर आणि दक्षिण भारतातील अनेक गुंतवणूकदारांनी समाधान व्यक्त केले आहे. तर पोलिसांनी गुंतवणूकदारांना सतर्क राहण्याचे आणि जास्त लाभ देणाऱ्या कोणत्याही आर्थिक योजना अधिक तपासून मगच गुंतवणूक करण्याचे आवाहन केले आहे.

# याया खान यांचा भाजपला रामराम, काँग्रेसमध्ये शेकडो कार्यकर्त्यांसह प्रवेश!

जनसंचलन/बुलडाणा



काँग्रेस हा विचारांचा पक्ष आहे. समाजातील सर्व घटकांना समान न्याय आणि संधी मिळावी, हीच आमची भूमिका आहे. सामाजिक ऐक्य, बंधुता आणि विकासाचा विचार करणारे कार्यकर्ते आमच्यासाठी संपत्ती आहेत. याया खान यांच्या प्रवेशामुळे काँग्रेस पक्ष अधिक बळकट होईल,ङ्ख असे जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष तथा माजी आमदार राहुल बोंद्रे यांनी सांगितले. चिखली शहरातील नूर चौक परिसरातील भाजपचे सक्रिय कार्यकर्ते याया खान यांनी अखेर भाजपच्या दुटप्पी कारभाराचा, अन्यायाचा आणि भ्रष्टाचाराचा पर्दाफाश करत शेकडो कार्यकर्त्यांसह शुक्रवार १० ऑक्टोबर रोजी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला. यावेळी राहुलभाऊ बोंद्रे बोलत होते. भाजपच्या काळात जनतेच्या विकासाच्या नावाखाली फक्त आश्वासने मिळाली, पण वास्तवात दिसला फक्त भ्रष्टाचार, पक्षपात आणि सामान्य माणसावर अन्याय, असे प्रतिपादन याया खान यांनी करत आम्ही अन्यायाच्या विरोधात सत्याच्या बाजूने आता राहुलभाऊंसोबतच राहणार असल्याचे सांगितले. यांप्रसंगी तालुका अध्यक्ष रामभाऊ जाधव, शहर अध्यक्ष राहुल सवडतकर, विष्णू पाटील कुळसुंदर, डॉ.मोहम्मद इसरार, कुणाल बोंद्रे,सचिन बोंद्रे,प्राचार्य निलेश गावंडे सर, प्राध्यापक राजू गवई, रिकी काकडे, आसिफ भाई, आमिनखान उस्मानखान,राजू रज्याक,गोपाल देव्हडे,मनोज लाहुडकर, नजीर कुरेशी,खलील बागवान, शेख जाकीर, विजय सोनवाल, आबरार बागवान,गणेश ठेंग, दिगंबर देशमाने, खलील गवळी, अज्जू खान, शेख शकील, अप्पू बागवान, शेख सद्दाम, आयान भाई, बाशिद जमदार यांची प्रमुख उपस्थिती होती.


आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी आजच बचत सुरु करा व त्याचे भविष्य सुरक्षित करा

बचत करा रु. ५०० प्रती माह पासून..



| गुंतवणुक रक्कम | | ५०० | १००० | १५०० | २००० | ३००० | ५००० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | गुंतवणुक कालावधी महिने | पाल्याच्या वयाच्या १८ वर्षांनंतर मिळणारी रक्कम | | | | | |
| १ | १५६ | १०३४१८ | २०६८३६ | ३१०२५४ | ४१३६७२ | ६२०५०७ | १०३४१७९ |
| २ | १४४ | ९५५४४ | १९१०८८ | २८६६३३ | ३८२१७७ | ५७३२६५ | ९५५४४२ |
| ३ | १३२ | ८८२६९ | १७६५३८ | २६४८०६ | ३५३०७५ | ५२९६१३ | ८८२६८८ |
| ४ | १२० | ८१५४४ | १६३०८७ | २४४६३१ | ३२६१७५ | ४८९२६२ | ८१५४३६ |
| ५ | १०८ | ७५३३६ | १५०६७१ | २२६००७ | ३०१३४२ | ४५२०१३ | ७५३३५५ |
| ६ | ९६ | ६५५९६ | १३९१९३ | २०८७८९ | २७८३८६ | ४१७५७९ | ६९५९६५ |

ठेवींवरील आकर्षक व्याजदर

| अ.क्र. | मुदती ठेवीचे विवरण | | लागू व्याजदर | पतसंस्था व इतर संस्था |
|---|---|---|---|---|
| १ | १५ दिवस ते ९० दिवस | | ६.००% | ६.००% |
| २ | ९१ दिवस ते १८० दिवस (वैयक्तीक ठेवी करिता) | | ६.५०% | ५.००% |
| ३ | १८१ दिवस ते १३ महिने | | ६.००% | ६.००% |
| ४ | १४ महिन्याच्या वर २४ महिन्यापर्यंत (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ५ | आवर्त ठेव योजना २४ महिन्याकरिता रू. १५ लाखाचे वर (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ६ | मासिक ठेव | | ७.००% | - |
| ७ | बचत ठेव | अ) रू. ३ लाखांपर्यंत | ३.००% | - |
| | | ब) रू. ३ लाखांचे वर | ४.५०% | - |

ज्येष्ठ नागरिक, सैनिक, सैनिकांच्या विधवा पत्नी, दिव्यांग यांना ठेवींच्या व्याजदरावर १/२ टक्का जास्त व्याजदर लागू राहील.

5 लाख पर्यंतच्या ठेवींना DICGC चे संरक्षण कवच प्राप्त आहे

पुन्हा एकदा... सुकन्या लक्षाधीश ठेव योजना



गुंतवणूकीचा कालावधी मुलीच्या वयाच्या १० वर्षापर्यंत

आजच जवळच्या शाखेशी संपर्क करा

ग्राहकांच्या आग्रहाला मान देऊन बँक पुन्हा सुरू करीत आहे

सुकन्या लक्षाधीश ठेव योजना

जन्मापासून ते वय वर्ष १० पर्यंतच्या मुलींच्या भावी आयुष्यासाठी एकदाच या योजनेत गुंतवणूक करा व मुलीच्या २१ व्या वर्षी लक्षाधीश व्हा.

| वय | गुंतवणूक रक्कम | मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| जन्माच्या वेळी | १७००० | १०३६०९ |
| १ वर्ष | १८००० | १००६५७ |
| २ वर्ष | १९५०० | १०००५२ |
| ३ वर्ष | २१५०० | १०१२१७ |
| ४ वर्ष | २३५०० | १०१५०९ |
| ५ वर्ष | २५५०० | १०१०६४ |
| ६ वर्ष | २७५०० | १००००३ |
| ७ वर्ष | ३०००० | १०००९७ |
| ८ वर्ष | ३३००० | १०१०२७ |
| ९ वर्ष | ३६००० | १०११२२ |
| १० वर्ष | ३९००० | १००५१५ |

दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली

मुख्यालय : डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चिखली, जि. बुलडाणा

फोन : ०७२६४-२४२०३९, २४२९७९, २४२०३८ टोल फ्रि नंबर : १८००-३१३-२३२४

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# महायुतीतील दोन नेत्यांमध्ये मोठा तणाव: भाजप मंत्र्याची एकनाथ शिंदेंवर थेट टीका; आक्रमक इशारा



**कल्याण :** तालुक्यातील १४ गावे नवी मुंबई शहरातील समावेश व नवी मुंबईतील पुनर्विकास प्रकल्पांसाठी वाढीव एफएसआयवरून संतप्त भाजप नेते गणेश नाईक यांनी शिवसेनेचे मुख्य नेते आणि राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर थेट हल्लाबोल केला आहे. त्यानंतर या टीकेची गंभीर दखल घेऊन शिवसेनेकडूनही गणेश नाईकांवर चौफेर टीकास्त्र सोडण्यात आलं आहे. त्यामुळे ठाणे-नवी मुंबई महापालिकांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शिंदे-नाईक संघर्ष पुन्हा विकोपाला गेला असून या वादामुळे ठाणे-नवी मुंबईतील म हापालिका निवडणुकीत महायुतीमध्ये तीव्र संघर्ष निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.नवी मुंबई महापालिकेत समाविष्ट करण्यात आलेली १४ गावांना विरोध करत शुक्रवारी गणेश नाईक यांनी, 'कोणाच्या तरी लहरीपणातून निर्माण झालेल्या गोष्टींचा बोजा नवी मुंबईतल्या जनतेवर टाकू देणार नाही. निवडणूक झाल्यानंतर सहा महिन्यात ही गावे बाहेर काढू. ही गावे बाहेर काढण्यासाठी गणेश नाईक आपल्या आयुष्याची पूर्ण पुण्याई कामाला लावेल', असा थेट इशारा नाईक यांनी दिला. तसंच, 'या गावांच्या विकासासाठी ६ हजार कोटी रुपये लागतील. भंगारचे कारखाने आल्यामुळे गावांमधील जलस्त्रोत प्रदूषित झाले असून या भागाची दुर्दशा झाली आहे', असे नाईक यांनी म्हटले होतं. तर, 'अशा लोकांच्या हाती सत्ता गेल्यावर नवी मुंबईचे नुकसान होईल', असा दावा त्यांनी केला होता.गणेश नाईक यांच्या टीकेचा संपूर्ण रोख उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे होता. अखेर शिवसेनेकडून उद्योगमंत्री उदय सामंत, नवी मुंबईतील शिवसेनेचे पदाधिकारी विजय चौघुले आणि ठाण्याचे खासदार नरेश म्हस्के यांनी या टीकेचा समाचार घेतला. 'राज्यात महायुतीचे सरकार आहे. तरीही सातत्याने गणेश नाईक हे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या विरोधात बेताल वक्तव्य करत आहेत आणि दिशाभूल करणारी माहिती पसरवत आहेत', असे खासदार नरेश म्हस्के यांनी माध्यमांशी संवाद साधताना कडक शब्दांत गणेश नाईक यांना सुनावलं.नवी मुंबईतील भूमिपुत्र, माथाडी कामगार व झोपडपट्टीधारकांना मोफत घरे मिळण्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी वाढीव एफएसआय, नवी मुंबई महापालिकेत समाविष्ट झालेल्या १४ गावांसाठी ७० कोटींचा निधी, असे निर्णय घेतल्याने गणेश नाईक यांचा जळफळाट होत असून त्यातून त्यांच्याकडून हे वक्तव्य केलं जात आहेत', असा पलटवार खासदार नरेश म्हस्के यांनी केला. शिवसेनेकडून शिंदे यांच्यावरील टीका खपवून घेतली जाणार नसल्याचं उदय सामंत यांनी स्पष्ट केलं. या टीकेवरून आता शिंदे -नाईक वाद पुन्हा एकदा उफाळला असून महानगरपालिका निवडणुकांच्या तोंडावर या वादात अधिक भर पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

## मत्स्य व्यावसायिकांनाही मिळणार कर्ज

**अमरावती :** मत्स्य व्यवसायाला शेतीचा दर्जा देण्यात आल्याने शेतकऱ्यांना रोजगाराचा नवा पर्याय उपलब्ध झाला आहे. आता मत्स्य व्यावसायिकांनाही किसान क्रेडिट कार्डसह शेतकऱ्यांना मिळणारी कर्जे उपलब्ध होतील', अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी मोर्शी येथे केली.अमरावती जिल्ह्यातील मोर्शी येथील मत्स्य विज्ञान महाविद्यालयाच्या भूमिपूजन प्रसंगी मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी व्यासपीठावर महसूलमंत्री तथा अम रावतीचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, मत्स्य व्यवसायमंत्री नितेश राणे , खासदार डॉ. अनिल बोंडे आदी उपस्थित होते. 'महायुतीचे सरकार शेतकऱ्यांना निश्चितपणे कर्जमाफीचा लाभ देणार आहे. शेतकऱ्यांना यापुढे दिवसा १२ तास वीज मिळणार आहे. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना यासाठी अमलात आणली जात आहे. ही योजना डिसेंबर २०२६ पर्यंत पूर्ण होईल', असे फडणवीस यांनी सांगितले.'राज्य शासनाच्या अनेक महत्त्वाकांक्षी योजना आहेत. एक हजार लोकवस्ती असणाऱ्या गावांना शहरापर्यंत जोडण्यासाठी सिमेंट काँक्रीटचे रस्ते तयार केले जाणार आहेत. यासाठी वीस हजार कोटी रुपये खर्च करण्यात येतील.

## पवारांना काय कामधंदा आहे? गौतमी पाटील प्रकरणावरील टीकेवर चंद्रकांत पाटलांचा सवाल

**कोल्हापूर :** रोहित पवारांना काय कामधंदा आहे? अशा शब्दांत संताप व्यक्त उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी राष्ट्रवादी काँग्रेस आमदार रोहित पवार यांच्या टीकेला कडक आणि स्पष्ट प्रत्युत्तर दिलंय. कोल्हापुरातील भाजपाच्या कोल्हापूर ग्रामीण पश्चिम विभागाच्या विजय संकल्प सभेला संबोधित केल्यानंतर मंत्री चंद्रकांत पाटील माध्यमांशी बोलत होते. सध्या चर्चेत असणाऱ्या गौतमी पाटील च्या गाडीचा अपघात प्रकरणावरुन राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार रोहित पवार यांनी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्यावर आरोप केले होते. अपघातग्रस्त गाडीत गौतमी पाटील नसतानाही तिला उचलण्यासाठी पोलिसांवर दबाव आणणे नेत्याला शोभत नसल्याची टीका रोहित पवारांनी सोशल मीडियावरून केली आहे.



गौतमी पाटील प्रकरणी रोहित पवार यांच्या टिकेबाबत पत्रकारांनी प्रश्न उपस्थित केला असता चंद्रकांत पाटील यांनी सुरुवातीला संताप व्यक्त केला. रोहित पवारांवर पलटवार करत ते म्हणाले, 'रोहित पवार यांना काय काम धंदा आहे? स्वतःची थोडी तरी पत राखून बोलत जा बाबा. मी काय करायला पाहिजे हे रोहित पवार याने शिकवण्याची गरज नाही. कोणत्या प्रकरणात आम्ही काय भूमिका घेतो, हे ढोल वाजवून सांगायची सवय आम्हाला नाही.' असंही त्यांनी स्पष्ट केलं आहे.कोल्हापूर जिल्ह्यातील भुदरगड तालुक्यातील पूर येथे भारतीय जनता पार्टी कोल्हापूर पश्चिम ग्रामीण विभागाची विजय संकल्प सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेत जिल्ह्यातील सर्व बूथ प्रमुख, शक्तिकेंद्र प्रमुख व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले. नव्याने नियुक्त झालेल्या जिल्हा पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्रांचे वितरण करण्यात आले. चंद्रकांत पाटील यांनी कार्यकर्त्यांना पुढील जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका व महानगरपालिका निवडणुकांसाठी सज्ज राहण्याचे आवाहन केले.या सभेनंतर चंद्रकांत पाटील यांनी माध्यमांशी संवाद साधताना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांविषयी महत्वाचे विधान केले. त्यांनी सांगितले की, कोर्टातील सर्व याचिका संपल्या असून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लवकरच होणार आहेत. दिवाळीनंतर लवकरच आचारसंहिताही लागेल. कोल्हापूर जिल्हा परिषद तसेच पंचायत समित्यांवर महायुतीचा अध्यक्ष असावा, यासाठी पक्षात एकमत आहे. निवडणुकांच्या तयारीसाठी पक्ष आणि कार्यकर्ते एकजुटीने काम करत आहेत. जिल्हा परिषद झाल्यानंतर महानगरपालिकेच्या निवडणुकीचीही तयारी लवकरच सुरू होईल, अशी माहिती त्यांनी दिली.

***

## राज ठाकरे उद्धव ठाकरे यांची मातोश्रीवर भेट



**मुंबई :** आताच्या घडीची सर्वात मोठी बातमी समोर येत आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या 'मातोश्री' निवासस्थानी दाखल झाले. त्यामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. आगामी मुंबई महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ही भेट सर्वात महत्त्वाची मानली जात आहे. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांनी एकत्र यावं, अशी लाखो मराठी नागरिकांची भावना आहे. या लाखो नागरिकांची आणि दोन्ही पक्षांच्या कार्यकर्त्यांची इच्छा पूर्ण होण्याची आता शक्यता आहे. दोन महिन्यांपासूनची राज आणि उद्धव ठाकरे यांच्या भेटीची ही पाचवी वेळ आहे.उद्धव ठाकरे यांच्या पक्षाचे खा.राऊत यांच्या नातूचा नामकरणाचा कार्यक्रम मुंबईतील बीकेसी येथील एका सभागृहात आयोजित करण्यात आला होता.

# कदमांनी बोलण्याच्या ओघात ४ महत्त्वाचे किस्से सांगितले

**मुंबई :** शिवसेनेचे नेते रामदास कदम यांनी दसरा मेळाव्यात बाळासाहेब ठाकरेंच्या निधनानंतर त्यांचं पार्थिव उद्धव ठाकरेंनी २ दिवस मातोश्रीवरच ठेवल्याचा दावा करत या सगळ्याबद्दल संशय व्यक्त केला. रामदास कदम यांच्या आरोपांना शिवसेना उबाठाचे आमदार अनिल परब यांनी उत्तर दिलं. मग रामदास कदम यांनी पत्रकार परिषद घेत परब यांच्यावर तोफ डागली. शिवसेनेच्या दोन गटांमध्ये जुंपलेली असल्यानं काही महत्त्वाच्या गोष्टींचा उलगडा झाला.बाळासाहेब ठाकरे यांच्या निधनाला जवळपास १३ वर्षे उलटलेली आहे. मग त्यांच्या निधनानंतर पार्थिव २ दिवस मातोश्रीवर का ठेवण्यात आलं, याचा उल्लेख आताच का केला, असा प्रश्न रामदास कदम यांना विचारण्यात आला. त्यावर कदम यांनी



बाळासाहेब ठाकरे हयात असताना आणि हयात नसताना आपल्याला पक्षात नसलेली वागणूक याकडे लक्ष वेधलं. यावेळी त्यांनी काही महत्त्वाचे किस्से सांगितले. बोलण्याच्या ओघात रामदास कदम यांनी अनेक गोष्टी सांगितल्या.

बाळासाहेब ठाकरे हयात असताना दसरा म ळाव्यात माझं भाषण व्हायचं. बाळासाहेब ठाकरे हयात असताना ते मला मेळाव्यात बोलण्याची संधी द्यायचे. पण बाळासाहेब ठाकरे गेले आणि उद्धव ठाकरेंनी वक्त्यांच्या यादीतून आपलं नाव वगळलं. उद्धव ठाकरेंनी असं का केलं, मला का बोलू दिलं नाही, असा प्रश्न रामदास कदम यांनी विचारला.बाळासाहेब ठाकरे हयात असताना पक्षाच्या व्यासपीठावर मला पहिल्या रांगेत स्थान असायचं. साहेबांनी कायम माझा सन्मान केला. पण साहेबांचं निधन झाल्यावर मला व्यासपीठावर कोणत्या रांगेत स्थान देण्यात आलं? मागच्या रांगेतील खुर्चीवर माझं नाव लिहिण्यात यायचं, अशी खदखद कदम यांनी बोलून दाखवली.बाळासाहेबांच्या निधनानंतर २०१४ मध्ये उद्धव ठाकरेंनी तुम्हाला मंत्रिपद दिलं, याची आठवण पत्रकारांनी कदम यांनी करून दाखवली. त्यावर लोक हसतील म्हणून त्यावेळी उद्धव ठाकरेंनी मला मंत्री केलं. पण खातं कोणतं दिलं? पर्यावरण मंत्रालय. त्यांचा नाईलाज होता, म्हणून मला मंत्री केलं, असं कदम म्हणाले.

दिवाकर रावते आणि मी पक्षात ज्येष्ठ होतो. मग आम्हाला २०१९ मध्ये मंत्रीपदं का दिली नाहीत? उद्धव ठाकरे मुख्यमंत्री झाले. पण रावते आणि मला डावललं. उद्धव ठाकरेंनी अगदी अपक्षांना मंत्रीपदं दिली. त्यांच्यासाठी हेलिकॉप्टर्स पाठवली. त्या नेत्यांचं काय योगदान होतं शिवसेना वाढवण्यात, असा सवाल कदम यांनी विचारला.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# 7 मैदाने...7 शतके, कसोटीत जैस्वालचे वाढते वर्चस्व

## पाचव्यांदा १५०+ धावांची 'यशस्वी' खेळी



**नवी दिल्ली :** युवा खेळाडूंमध्ये क्वचितच आढळणारी शांत दृढता यशस्वी जैस्वालमध्ये ठासून भरलेली आहे. वयाच्या २३ व्या वर्षी हा भारतीय सलामीवीर प्रत्येक नवीन मैदानास आपले व्यासपीठ बनवत आहे. त्याने वेस्ट इंडिजविरुद्ध दिल्ली कसोटीच्या पहिल्या दिवशी शतक पूर्ण केले. ही केवळ धावांची नोंद नाही, तर ७ वेगवेगळ्या मैदानांवर ७ कसोटी शतकांचा विक्रम होता. हा आकडा केवळ त्याची सातत्यपूर्ण कामगिरी नव्हे, तर त्याची परिस्थितीशी जुळवून घेण्याची क्षमता दर्शवतो. आणि हीच कोणत्याही जागतिक दर्जाच्या फलंदाजाची खरी ओळख असते.

पहिल्या दिवसाचा खेळ संपेपर्यंत, भारताने दोन गडी गमावून ३१८ धावा केल्या. यशस्वी १७३ धावांवर आणि शुभमन गिल २० धावांवर नाबाद आहेत. साई सुदर्शन ८७ आणि केएल राहुल ३८ धावा करून बाद झाले.

या प्रवासाची सुरुवात २०२३ मध्ये रोसियो, डोमिनिका येथे झाली. आपल्या पहिल्याच कसोटीत, वेस्ट इंडिजविरुद्ध यशस्वीने १७१ धावांची शानदार खेळी केली होती. सुमारे आठ तास फलंदाजी करताना, त्याने केवळ आपल्यातील प्रतिभाच नव्हे, तर धैर्य आणि अभिजात कसोटी क्रिकेटचे प्रदर्शन केले.

यानंतर, इंग्लंडमधील लीड्स आणि द ओव्हल येथे चेंडू स्विंग आणि बाऊन्स दोन्ही होतो अशा मैदानांवर त्याने परदेशी परिस्थितीतही टिकाव धरण्याची क्षमता दाखवून दिली. तेथे त्याने संयम आणि आक्रमकता यांचा उत्कृष्ट समतोल राखत धावा जमा केल्या. वेस्ट इंडिजविरुद्ध घरच्या मैदानावर आणि आता दिल्लीत, जैस्वालने पुन्हा एकदा सिद्ध केले आहे की, तो तांत्रिकदृष्ट्या सशक्त आणि मानसिकदृष्ट्या अत्यंत मजबूत आहे. यशस्वी जैस्वालचे वैशिष्ट्य हे आहे की त्याची शतके केवळ सोप्या किंवा सपाट खेळपट्ट्यांवर आलेली नाहीत. दिल्ली कसोटीत त्याने १४५ चेंडूंमध्ये १६ चौकार लगावत आपले सातवे शतक पूर्ण केले. त्याच्या फलंदाजीमध्ये पारंपरिक कव्हर ड्राइव्हस सोबतच आक्रमक कट शॉट्सचे मिश्रण पाहायला मिळाले. अनेक तज्ज्ञांच्या मते, जैस्वालची सर्वात मोठी ताकद म्हणजे त्याची सुस्पष्ट विचारसरणी. त्याला कधी डाव उभारायचा, कधी नियंत्रण ठेवायचे आणि कधी आक्रमण करायचे, हे नेमके ठाऊक असते. अहमदाबाद कसोटीत ३६ धावांवर बाद झाल्यानंतर त्याने सलग दोन दिवस नेटमध्ये केलेल्या कठोर परिश्रमातून हे स्पष्ट झाले. दिल्ली कसोटीपूर्वीची त्याची तयारी दर्शवते की तो प्रत्येक अपयशाचे रूपांतर शिकण्यात करण्याची क्षमता ठेवतो. यशस्वी जैस्वालच्या प्रत्येक शतकाने भारतासाठी सामन्याची बदलली आहे. रोसियोमधील पदार्पण शतकाने भारताला मोठा विजय मिळवून दिला. इंग्लंडविरुद्धची शतके कठीण परिस्थितीत संघासाठी स्थिरता घेऊन आली. आणि आता दिल्लीचे शतक, ज्यामुळे पहिल्याच दिवशी भारताने सामन्यावर नियंत्रण मिळवले.

### मोठ्या भरारीची तयारी

जैस्वालची खेळी नेहमीच भारताच्या डावाचा पाया रचते आणि मधल्या फळीवरील दबाव कमी करते. अवघ्या दोन वर्षांत ५० च्या सरासरीसह सात शतके आणि १२ अर्धशतके ही कोणत्याही युवा फलंदाजासाठी विलक्षण कामगिरी आहे. कॅरिबियन बेटे असोत, इंग्लंडची थंडी असो किंवा भारताच्या कोरड्या खेळपट्ट्या, जैस्वालने प्रत्येक ठिकाणी आपल्या खेळात फेरबदल केले आहेत. त्याच्या प्रत्येक फटक्यात आत्मविश्वास, प्रत्येक धावेत परिपक्वता आहे.

# या तारखेला होणार आयपीएल ऑक्शन

**नवी दिल्ली :** आयपीएल २०२६ ची तयारी आधीच सुरू झाली आहे. जरी इंडियन प्रीमियर लीगचा पुढील सत्र अजून दूर असला तरी त्याआधीच ऑक्शन होणार आहे आणि त्याआधी टीम्स आपापल्या खेळाडूंना रिटेनही करतील. यावेळी आयपीएलच्या पुढील सत्रापूर्वी काही महत्वाच्या तारखा समोर आल्या आहेत, ज्या खूप महत्त्वाच्या ठरतील.

पुढील आयपीएल सत्रापूर्वी ऑक्शन आयोजित होणार आहे. यंदा मेगा ऑक्शन नाही, तर मिनी ऑक्शन आयोजित होईल. रिपोर्ट्सनुसार, १३ ते १५ डिसेंबरच्या दरम्यान एखाद्या दिवशी हा ऑक्शन होईल. मात्र, अद्याप बीसीसीआय आणि आयपीएल गव्हर्निंग काउन्सिलने कोणतीही तारीख निश्चित केलेली नाही. या दिलेल्या तारखांपैकी लवकरच एक तारीख अंतिम करून जाहीर होईल, असा अंदाज वर्तवला जात आहे. आधीच्या दोन आयपीएल सत्रांमध्ये ऑक्शन भारताबाहेर झाले होते, पण यंदा ऑक्शन भारतातच होणार आहे. ऑक्शन कोलकाता किंवा बेंगळुरूमध्ये होऊ शकते. ळश्रि-रीलींळेप-वरींश-२०२६ याव्यतिरिक्त, आयपीएल टीम्स ज्या खेळाडूंचा रिटेन करायचा आहे, त्याची शेवटची तारीख १५ नोव्हेंबर ठरवली गेली आहे. या दिवशी संध्याकाळपर्यंत सर्व दहा टीम्स आपापल्या रिटेन आणि रिलीज केलेल्या खेळाडूंची यादी बीसीसीआय कडे सादर करतील. या दिवशीच कोणती टीम कोणत्या खेळाडूला रिटेन करेल आणि कोणाला सोडेल, याचा खुलासा होईल. सामान्यतः टीम्स मिनी ऑक्शनपूर्वी फार मोठे बदल करत नाहीत. ज्या टीम्सने आयपीएल २०२५ मध्ये खराब कामगिरी केली आहे, त्यात मुख्यत्वे राजस्थान रॉयल्स आणि चेन्नई सुपरकिंग्स यांचा समावेश आहे. काही इतर टीम्सही बदल करण्याच्या विचारात आहेत, पण सध्या कोणत्याही मोठ्या खेळाडूंची नावे समोर आलेली नाहीत. आता तारखा समोर आल्यामुळे टीम्सही खेळाडूंशी चर्चा करून आपापले स्क्वॉड निश्चित करण्याची तयारी सुरू करत आहेत.



# गिल करणार ब्रॅडमननंतरचा विक्रम

**मुंबई :** टीम इंडियाच्या कसोटी संघाचा कर्णधार झाल्यापासून शुभमन गिलची फलंदाजी आणखी धारदार झाली आहे. वेस्ट इंडिजविरुद्ध सुरू असलेल्या कसोटी मालिकेच्या पहिल्या सामन्यात त्याने जास्त धावा काढल्या नसल्या तरी, इंग्लंडविरुद्धच्या मागील मालिकेत त्याने खूप धावा केल्या आणि अनेक विक्रम मोडले. आता, गिल पुढच्या सामन्याची वाट पाहत आहे, जेव्हा त्याला आणखी एक कामगिरी करण्याची संधी मिळेल. अनेक फलंदाज डॉन ब्रॅडमनचा विक्रम मोडण्याच्या जवळ पोहोचले आहेत, परंतु ते करण्यात अयशस्वी झाले आहेत. शुभमन गिल कदाचित तो मोडू शकणार नाही, परंतु असा विक्रम करणारा तो डॉननंतर नक्कीच दुसरा कर्णधार बनेल.

डॉन ब्रॅडमन त्याच्या संघाचा कसोटी कर्णधार झाला तेव्हा त्याने सर्वात कमी डावांमध्ये १,००० धावा केल्या. तेव्हापासून, कोणीही हा विक्रम मोडू शकलेला नाही. हा विक्रम जवळजवळ अशक्य आहे. शुभमन गिल देखील हा विक्रम मोडू शकणार नाही, परंतु डॉन ब्रॅडमन नंतर तो सर्वात जलद १००० कसोटी धावा करणारा कर्णधार बनेल हे निश्चित आहे. जगातील महान फलंदाजांपैकी एक मानले जाणारे डॉन ब्रॅडमन यांनी कर्णधार झाल्यानंतर फक्त ११ डावात १००० धावा केल्या. ब्रॅडमन नंतर अनेक कर्णधार या विक्रमाच्या जवळ पोहोचले पण तो मोडू शकले नाहीत. श्रीलंकेचा कामेंदु मेंडिस देखील एकदा खूप जवळ आला होता. शुभमन गिलने कसोटी कर्णधार झाल्यानंतर त्याच्या पहिल्या १० कसोटी डावात ७५४ धावा केल्या. त्यानंतर, जेव्हा तो वेस्ट इंडिजविरुद्ध घरच्या मैदानावर पहिल्या कसोटीसाठी मैदानात उतरला तेव्हा त्याने ५० धावा जोडल्या.

# रहीमच्या गोलमुळे भारताने सिंगापूरला १-१ गोल बरोबरीत रोखले



**कलांग :** सिंगापूरमधील नॅशनल स्टेडियममध्ये गुरुवारी रात्री झालेल्या एएफसी एशियन फुटबॉल चषक स्पर्धेच्या (२०२७) तिसऱ्या फेरीच्या पात्रता सामन्यात, रहीम अलीने नोंदविलेल्या गोलच्या जोरावर भारताने यजमान सिंगापूरला १-१ अशा गोल बरोबरीत रोखले. सामन्याच्या ९० व्या मिनिटाला रहीम अलीचा हा गोल केला. त्याचा पहिला आंतरराष्ट्रीय गोल ठरला.

सामन्याच्या पहिल्या हाफच्या स्टॉपेज वेळेत इख्सान फंडीने भारतीय बचावफळी भेदून गोल करत सिंगापूरला आघाडी मिळवून दिली. दुसऱ्या हाफच्या सुरुवातीलाच, भारतीय मध्यरक्षक संदेश झिंगनला फंडीला अवैधरीत्या रोखल्याबद्दल पंचांनी दुसरे पिवळे कार्ड दाखविले. त्यामुळे झिंगन सामन्यात बाहेर गेला. परिणामी, भारतीय संघाला दहा खेळाडूंवर खेळावे लागले. एक गोलने पिछाडीवर पडलेल्या भारताला सामन्याच्या ९० व्या मिनिटाला रहीम अलीने गोल करत बरोबरी साधून दिली. सिंगापूरचा गोलरक्षक इझवान महबूदच्या चुकीचा फायदा घेत रहीमने चेंडूला जाळे दाखविले.

या बरोबरीमुळे तीन फेर्यांनंतर भारत दोन गुणांसह ग्रुप सी मध्ये तिसऱ्या स्थानावर आहे, तर सिंगापूर दुसऱ्या स्थानावर घसरला आहे. याच गटात हाँगकाँगने बांगला देशवर ४-३ ने विजय मिळवत अव्वल स्थान पटकावले आहे.

सामन्यानंतर सुनील छेत्रीने सांगितले की, एशियन कप २०२७ मध्ये पात्र होण्यासाठी अजूनही भारताकडे संधी आहे. भारताला आता उर्वरित तीनही सामने जिंकावे लागतील आणि इतर तीन संघांना गुण गमावण्याची आशा करावी लागेल, तेव्हाच एशियन कपमध्ये स्थान मिळवण्याची संधी मिळू शकेल. या दोन संघांमधील पुढील सामना १४ ऑक्टोबर रोजी गोव्यातील जवाहरलाल नेहरू स्टेडियमवर होणार आहे.

# इमरान-यामीचा 'हक' चित्रपट विवादात!

**मुंबई :** अभिनेता इमरान हाशमी आणि यामी गौतम चा 'हक' चित्रपटाविरोधात शाह बानो यांच्या मुलीने कायदेशीर नोटीस पाठवली आहे. निर्मात्यांनी विना परवानगी चित्रपट बनवल्याचा आरोप तिने केला आहे.

बॉलिवूडचा लोकप्रिय अभिनेता इमरान हाशमी आणि अभिनेत्री यामी गौतम यांचा आगामी चित्रपट 'हक' सध्या वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. शाह बानो प्रकरणावर आधारित असल्याचं म्हटलं जाणाऱ्या या चित्रपटावर आता शाह बानो यांच्या मुलीनेच कायदेशीर नोटीस पाठवली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शाह बानोच्या मुलीने चित्रपट निर्मात्यांवर विना परवानगी त्यांच्या कुटुंबाच्या कथेनुसार चित्रपट तयार केल्याचा आरोप केला आहे. तिच्या म्हणण्यानुसार, 'हक' या चित्रपटात त्यांच्या आईच्या खऱ्या आयुष्यावर आधारित काही घटनांचा वापर करण्यात आला आहे, पण यासाठी त्यांची संमती घेतलेली नाही. इमरान-यामी गौतमचा आगामी चित्रपट 'हक'ची





कहाणी शाह बानोशी प्रेरित आहे. शाह बानो बेगम यांच्या मुलीने सिद्दीका बेगमने चित्रपट निर्माता आणि सेंट्रल बोर्ड ऑफ फिल्म सर्टिफिकेशनला लीगल नोटीस पाठवली आहे. मीडिया रिपोर्टनुसार, नोटिसमध्ये चित्रपटाचे रिलीज, प्रमोशन आण स्क्रीनिंगवर स्थगिती देण्याची मागणी करण्यात आली आहे.

याशिवाय, हा देखील आरोप लावण्यात आला आहे की, शाह बानो यांच्या वैयक्तिक आयुष्याविषयी दाखवण्यात आले आहे. आणि त्यासाठी त्यांच्या कुटुंबीयाची परवानगी घेण्यात आलेली नाही. सिद्दीका बेगमने तौसीफ जेड वारसी द्वारा चार पार्टीजना नोटीस पाठवलीय. डायरेक्टर सुपर्ण वर्मा, प्रोडक्शन पार्टनर जंगली पिक्चर्स, बावेजा स्टुडियोज, सेंट्रल बोर्ड ऑफ फिल्म सर्टिफिकेशन इ. 'हक' चित्रपटाचं दिग्दर्शन सपुर्ण वर्माने केलं आहे. यामध्ये इमरान हाशमी आणि यामी गौतम महत्वाच्या भूमिका साकारत आहेत. चित्रपटाचे पोस्टर आणि पहिला लूक नुकतेच प्रदर्शित झाले होते आणि त्यानंतरच या वादाची ठिणगी पडली. हा चित्रपट ७ नोव्हेंबरला चित्रपटगृहात रिलीज होणार आहे. यामी गौतम शाह बानोच्या भूमिकेत असेल. सध्या या नोटिशीवर निर्मात्यांकडून कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही. सूत्रांनुसार, 'हक' हा चित्रपट थेट ओटीटी प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित करण्याचा विचार केला जात आहे.

## सिनेमात बीफ बिर्याणी खातानाचा सीन; सेन्सॉरचा विरोध

**मुंबई :** सिनेमे आणि वाद हे समीकरण नवीन नाही. एखाद्या सिनेमाबाबत वाद कधी कलाकारांसंदर्भात असतो, कधी सिनेमाच्या कथेसंदर्भात असतो तर कधी सिनेमातील एखाद्या सीनबाबतचा असतो. असाच एका सिनेमाबाबतचा वाद उफाळून आला आहे. शेन निगमचा आगामी रोमँटिक ड्रामा 'हाल' सेन्सॉरच्या कात्रीत सापडला आहे. सेन्सॉरने या सिनेमात १५ दृश्यांना कात्री लावली आहे. या दृश्यात संबंधित कलाकार बीफ बिर्याणी खाताना दाखवले आहेत. सेन्सॉरच्या या आक्षेपामुळे 'हाल'चा रिलीज अडचणीत आला आहे.



सिनेमाच्या पीआरओनुसार बोर्डाने निर्मात्यांना १५ सीन हटवण्यास सांगितले आहेत. ज्यामध्ये 'ध्वजा प्रणाम', 'संघम कवल उंड', आणि बीफ बिर्याणी खातानाच्या दृश्यांचा समावेश आहे.

अबोर्डाच्या निर्णयावर निर्मात्यानी नाराजी व्यक्त केली आहे. याशिवाय सिनेमामध्ये असे कोणतेही दृश्य असल्याचा इन्कार केला आहे. असा कोणता सीन असल्याचा निर्मात्यांचा समज असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

सिनेमातील कट जर सेन्सॉरच्या म्हणण्यानुसार केले गेले तर सिनेमाला बोर्डाकडून अ प्रमाणपत्र मिळू शकते. १० सप्टेंबरला सेन्सॉर बोर्डासाठी सिनेमाचा शोही आयोजित केला होता.

यापूर्वी निर्मात्यांनी दुसरा सिनेमा बलतीसोबत टक्कर होऊ नये म्हणून हा सिनेमा पुढे ढकलला गेला होता. सिनेमा रिलीज होण्यासाठी १५ कट करण्याचे निर्मात्यांची इच्छा दिसत नाही. उलट त्यांनी या सिनेमात असा काही सीन नसल्याचे सांगितले आहे. या निर्णयांविरोधात त्यांनी उच्च न्यायालयात अपील केली आहे.



## मकामाचे तास आणि वेतनाबद्दलचे प्रश्न फक्त महिलांनाच का?

### काम करण्याच्या मागणीवर दीपिकाने सोडलं मौन

**मुंबई : अभिनेत्री दीपिका पादुकोण हे हिंदी सिनेविश्वातील आघाडीची नायिका आहे. 'ओम शांती ओम' सारख्या चित्रपटातून इंडस्ट्रीत पदार्पण करत दीपिकाने इंडस्ट्रीत स्वत चं स्थान निर्माण केलं आहे. आजवर तिने साकारलेल्या प्रत्येक भूमिकेचं कौतुक झालं. 'ओम शांती ओम', 'बाजीराव मस्तानी', 'पद्मावत', 'पिकू', 'ये जवानी है दिवानी', 'हॅप्पी न्यू इयर', 'पठाण' यांसारख्या चित्रपटांमध्ये तिने दमदार भूमिका साकारल्या आहेत. दरम्यान, मागील काही दिवसांपासून दीपिका पादुकोण आठ तासांच्या कामाच्या मागणीमुळे सात्यत्याने चर्चेत येत आहे. अशातच नुकतीच दीपिकाने एका कार्यक्रमात सध्या इंडस्ट्रीत सुरु असलेल्या चर्चांवर भाष्य करत आपली प्रतिक्रिया दिली आहे.**

काही महिन्यांपूर्वी अभिनेत्री दीपिका पादुकोण हिंनं आठ तासांच्या शिफ्टमध्येच काम करणार असल्याचं स्पष्ट केलं. पण तिच्या या मागणीनंतर बॉलिवूडसह मराठी मनोरंजनविश्वातही चर्चा सुरू झाली. त्यात अलिकडेच जागतिक मानसिक आरोग्य दिनाच्या निमित्ताने दीपिका पादुकोणने मध्य प्रदेशला भेट दिली. यावेळी त्यांच्या 'Live Love Laugh' या फाऊंडेशनच्या दहा वर्षांच्या प्रवासाचा विशेष टप्पा साजरा करण्यात आला. ही संस्था गेल्या दशकभरात भारतात मानसिक आरोग्याबद्दल जागरूकता आणि समर्थन यासाठी महत्त्वपूर्ण काम करत आहे. याचदरम्यान, दीपिका पादुकोणला प्रश्न विचारण्यात आला की,तुम्ही जसं न्याय मागता, त्यासाठी कधी तुम्हाला किंमत मोजावी लागली का? या प्रश्नाचं दीपिकाने एका अतिशय विचारपूर्वक आणि प्रगल्भ उत्तराने प्रत्युत्तर दिलं.'मी अनेक स्तरांवर काम केलं आहे, हे माझ्यासाठी नवीन नाही. मला अगदी मानधनासारख्या गोष्टींच्या बाबतीतही जे काही अनुभव माझ्या वाट्याला आले त्याला तोंड द्यावं लागलं. याला नक्की काय म्हणावं हे मला माहीत नाही, पण मी अशी व्यक्ती आहे जी नेहमी आपल्या लढाया शांतपणे लढते. शिवाय काही कारणांमुळे कधीकधी तो चर्चेचा विषय बनवला जातो.ज्याबद्दल मला काही कल्पनाही नसते.पण, माझ्या लढाया शांततेत आणि सन्मानानं लढणं, हेच मला योग्य वाटतं.'

दीपिकाने यादरम्यान, तिच्या वैयक्तिक प्रवासाचा नव्हे, तर व्यवसायिक आयुष्यातील समानता, न्याय आणि आत्मसन्मान यासारख्या मोठ्या मुद्द्यांचाही वेध घेतला आहे. दीपिका तिच्या स्वभावाला साजेसं काम, पडद्यावर आणि पडद्याच्या बाहेर शांततेने, धैर्याने आणि प्रामाणिकपणे करत राहते, असंही तिने या कार्यक्रमात म्हटलं.

दरम्यान, दीपिका पादुकोणने गरोदर असताना कामातून ब्रेक घेतला होता. त्यानंतर ती संदीप रेडी वांगा यांच्या बहुचर्तित स्पिरिट मधून एक्झिट घेतल्याने तिची सर्वत्र चर्चा झाली. या कार्यक्रमात दीपिकाने दिलेल्या उत्तराने अनेकांची मनं जिंकली आहेत. दीपिकाच्या कामाबद्दल बोलायचं झालं तर, लवकरच ती शाहरुख खानसोबत 'किंग' चित्रपटात दिसणार आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# हिंदूत्वाचा विचार संघटित शक्तीने व्यक्तीमत्व घडवितो : गार्गी जोशी

**जनसंचलन/बुलढाणा**

पाश्चात्य संस्कृतीमध्ये स्त्रीयांना उपभोगाची समजतात परंतू भारतीय संस्कृतीत मातृशक्तीने असुराचा नाश करून धर्माचा विजय केला. हिंदू धर्मात आपण जन्म घेतला आहे. भारताची वंशावळ विश्वात वेगळी असून प्रत्येकाचे पूर्वज हिंदू आहे.स्वदेशी भाषा, वेशभूषा, पर्यावरण जागृती, स्वच्छता, नागरिकांचे कर्तव्य, हिंदूत्वाचा विचार आचरणातून संघटित शक्तीने सदाचार संस्कृती टिकवून व्यक्तीमत्व घडविण्याचे कार्य राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, राष्ट्र सेविका समितीच्या शाखा मधून केल्या जाते. असे विचार रा. स्व. संघ वाशिमच्या गार्गी विवेक जोशी (पितळे) यांनी व्यक्त केले. राष्ट्रसेविका समिती शाखा बुलढाणाच्या वतीने विजयादशमी शस्त्रपूजन उत्सव दि. १२ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५ वाजता दि व्हिजन इंग्लीश स्कूल चैतन्यवाडी बुलढाणाच्या प्रागंणावर संपन्न झाला. प्रमुख अतिथी डॉ. स्मिता गजानन जोगळेकर यशवंत अध्यापक विद्यालय बुलढाणा, नगर कार्यवाहिका मिना कुळकर्णी, विभाग कार्यवाहिका निता जोशी, व्यासपीठावर उपस्थित होत्या. प्रारंभी दिपप्रज्वलन, भारतमाता, शस्त्रपूजन करण्यात आले. समिती सेविकांनी दंड प्रात्याक्षिक सादर झाले. तत्पूर्वी सायंकाळी ४ वाजता संघस्थान येथून सेविकांचे घोषपथकासह शहरातून पथसंचलन निघाले ठिकठिकाणी विविध संघटना बंधू भगिणींनी पुष्प वर्षाव केला. फटाके फोडून स्वागत केले. प्रमुख वक्त्या गार्गी जोशी यांनी सांगितले की स्वातंत्र्यपूर्व काळापासून आपल्या पूर्वजांनी रक्ताचे बलिदान देवून राष्ट्रभक्तीचा जागर केला. लोकमान्य टिळक, अहिल्यादेवी, डॉ. हेडगेवार, स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे हिंदू राष्ट्र निर्मितीचे ज्वाजल्य विचार त्यांच्या प्रेरणा आपल्यासाठी आदर्श आहे. स्वराज्याच्या रक्षणासाठी छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज यांनी अनेक लढाईतून हालअपेष्टा सहन केल्या. आज आपण आधुनिक तंत्र यंत्राच्या युगात जगतो आहे. तंत्रज्ञानाचा अभ्यास करून जगाच्या सोबत स्विकार करतांना स्वदेशी भाषा संस्कृत, मराठी भाषा शिवाय वेशभूषांचा स्विकार करून निसर्गाच्या सानिध्यात पर्यावरण जनजागृती, स्वच्छता, नागरिकाचे कर्तव्य संघटित शक्तीने अंगीकारले पाहिजे. स्त्री सक्षम, शिक्षीत झाली तर कुटुंबांची प्रगती होते. आपण एकत्रित येण्यासाठी सण उत्सव साजरे करतो. आचार विचाराची देवाण घेवाणकरून कुळाचार संस्कृतीशी नाळ जोडली पाहिजे. जगाचा विश्व गुरु होण्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी प्रत्येकाने राष्ट्र निर्माणाच्या कार्यात त्याग समर्पणाच्या भावनेतून संघटित शक्ती निर्माण होते. असे त्यांनी आवर्जून सांगितले. प्रमुख अतिथी डॉ.स्मिता जोगळेकर यांनी सांगितले की ला वंदनिय मावशी केळकर यांनी राष्ट्र सेविका समितीच्या माध्यमातून राष्ट्रभक्त सेवा, शिस्त, स्वाभीमान, व्यायाम, संस्कारक्षम मातृशक्तीचे संघटन निर्माण केले. आज ९० वर्षे या सकारात्मक राष्ट्रशक्तीला झाले आहे. मातृशक्तीचे उदाहरण सिता त्यागाचे प्रतिक, सावित्री, अहिल्यादेवी सहनशक्ती राष्ट्र प्रेरणाचा स्त्रोत, संत मिराबाई गाणकोकिळा अशा अनेकांनी समाजाला आदर्श दिला. कुटुंब व्यवस्थेतील प्रमुख नारीशक्तीने इतिहास घडविला असल्याचे त्यांनी सांगितले. संचलन भावना वैद्य, अमृतवचन रुजुला गोडबोले, डॉ. स्मिता जोगळेकर यांचे स्वागत वैशाली शिरसाट, गार्गी जोशी यांचे स्वागत मिना कुळकर्णी तसेच आभार नगर कार्यवाहिका मिना कुळकर्णी यांनी केले. उत्सवाला नगरातील विविध क्षेत्रातील मान्यवर महिला मंडळ, जेष्ठ नागरिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# चिखली शहरात पॉलिथीन बॅगचा वापर बंद करा!

**जनसंचलन/ चिखली**



शासनाने पर्यावरणास हानी करणाऱ्या पॉलिथीन व तत्सव वस्तूंच्या वापरांवर बंदी घातलेली असतांनाही सर्वत्र पॉलिथीन बॅग सर्रास वापरात येत असल्याचे दिसून येते. यामुळे पर्यावरणासह मानवी आरोग्याला अनेक प्रकारे धोका निर्माण होत असून चिखली शहरात सदर हानीकारक पॉलिथीन बॅग व तत्सम वस्तूंच्या वापरावर तात्काळ बंदी घालावी अशी मागणी शहरातील सूज्ञ नागरिकांनी नगर परिषदेचे मुख्याधिकारी यांचेकडे एका निवेदनाद्वारे केली आहे. या निवेदनात म्हटले आहे की, केंद्र व राज्य शासनाच्या निर्देशानुसार पर्यावरणास हानीकारक पॉलिथीन व तत्सम वस्तूंवर बंदी घालण्यात आली आहे. मात्र तरीही सर्वत्र सदर वस्तूंचा सर्रासपणे वापर होतांना दिसतो. यामुळे शासनाच्या नियमाची पायमल्ली होत आहे. विशेषत: कॅरीबॅगचा वापर सगळीकडे सुरु आहे. यामुळे पर्यावरण व आरोग्यास हानी पोहोचत आहे. शहरातील सर्वच लहान-मोठे दुकानदार, व्यावसायीक, दूध विक्रेते, फळविक्रेते, भाजीपाला विक्रेते, मांस-मच्छी विक्रेते खुलेआम कॅरीबॅगचा वापर करतांना दिसतात. यामुळे मोकळ्या जागा, नाल्यांच्या काठावर तसेच रसत्यांवर हा कचरा फेकला जातो किंवा जाळण्यात येतो. याबाबत व्यावसायीकांना विचारणा केली असता घंटागाडी ठरलेल्या दिवशी व वेळी येत नसल्याने हा कचरा जाळून टाकत असल्याचे उत्तर त्यांचेकडून मिळाले. नगर परिषदेचे यासाठी योग्य नियोजन करुन स्वच्छ भारत अभियानात आपले शहर मागे नसल्याचे दाखवून दिले पाहिजे. यासाठी नागरीक सहकार्य करण्यास तयार आहेत. तसेच नगरात काही दुकानदार डिस्पोजल ग्लास, वाट्या, द्रोण, पत्रावळी विक्री करुन पर्यावरण ऱ्हासाला हातभार लावत आहेत. यामुळे लग्न समारंभ, भंडारे, सामाजिक व धार्मिक कार्यक्रमात या साहित्याचा वापर सर्रासपणे करण्यात येतो. मंगल कार्यालये व लॉन्स मध्ये सुध्दा याचा वापर वाढलेला असून पर्यावरणास मोठी हानी होत आहे. तरी या गंभीर बाबीकडे विशेष लक्ष देवून शहर स्वच्छ ठेवावे आणि चिखली नगरात पॉलिथीन विक्रीवर बंदी घालावी अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. या निवेदनावर येथील प्रतिष्ठीत व्यावसायीक शरद भाला, सुभाषआप्पा झगडे, माधव कुळकर्णी, किरण पिंपरकर, निलेश पाठक, अनिल तिडके, अशोक अग्रवाल, उद्धव तुपकर, नंदकिशोर गोंधणे आदींसह अनेक नागरीकांच्या स्वाक्षऱ्याआहेत.

# अभिता कंपनीच्या पहिल्या महिला ड्रोन पायलटपदी केळवदची उज्वला हिवाळे!

## भडगाव येथे तूर फवारणीने सेवेला प्रारंभ!

**जनसंचलन/बुलढाणा**

कृषी क्षेत्रात अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याचा नावलौकिक असलेल्या अभिता कंपनीमध्ये पहिली महिला ड्रोन पायलट म्हणून केळवदची उज्वला हिवाळे रुजू झाली आहे. जिल्ह्यासाठी ही अभिमानास्पद बाब आहे. दरम्यान आज तालुक्यातील भडगाव येथील केशवराव तायडे यांच्या शेतात ड्रोनद्वारे तूर फवारणी करुन तिने सेवेला प्रारंभ केला. अभिता ॲग्रो इंडस्ट्रीज प्रा. लि. कंपनी शेती तंत्रज्ञानासाठी तत्पर असून कंपनीने बुलढाणा जिल्ह्यासाठी भाडेतत्वावर कृषी ड्रोन सुविधा सुरू केली आहे. एक एकर फवारणीसाठी अवघ्या सात आठ मिनिटांचा अवधी लागतो. यासाठी ९० टक्के पाण्याची बचत होते. शिवाय औषध प्रभावीपणे पिकांना लागू होतात. ड्रोन फवारणी हा पहिला व वेगळा उपक्रम शेतकरी बांधवांसाठी सुरू करत असल्याचे अभिता ॲग्रो कंपनीचे सीईओ सुनील शेळके यांनी सांगितले. स्वतः शेतकरी कुटुंबातील असल्याने ना नफा ना तोटा या तत्त्वावर शेतकऱ्यांसाठी हा उपक्रम त्यांनी सुरू केला आहे. पीक वाढलेले असताना पिकावर औषध फवारणी करणे हे दिव्यच असते. पाठीवर स्प्रे पंप घेऊन काम करणे देखील अंग मेहनतीची आहे. शिवाय सर्प, विंचूदंशच्या घटनाही घडतात. बळीराजाला मात्र हे धोके वारंवार पत्करावे लागतात. आज तंत्रज्ञान विकसित झाले आहे. त्याच तंत्रज्ञानाची कास धरून ड्रोन फवारणीचा पर्याय प्रथमच जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी उपलब्ध झाला आहे. कंपनीचे सीईओ सुनील शेळके यांनी वाहन व कर्मचारी देखील प्रशिक्षित केले आहेत. बुलढाणा येथे कंपनीचे ऑफिस सुरू करण्यात आले आहे. येथेच शेतकऱ्यांना फवारणीसाठी संपर्क करता येणार आहे. अभिता ॲग्रो कंपनीचे सीईओ सुनील शेळके हे कल्पक नेतृत्व आहे. विविधांगी प्रयोग त्यांनी जिल्ह्यामध्ये केले. संत्रा प्रक्रिया उद्योग, अभीता ॲग्रो कंपनी, चित्रपट निर्मिती अशा वेगवेगळ्या संकल्पना त्यांनी राबवल्या व यशस्वी केल्या. जिल्ह्यातील



शेतकऱ्यांसाठी ड्रोन फवारणी चा पर्याय असावा हा विचार गेल्या काही दिवसांपासून त्यांच्या मनामध्ये घोळत होता. त्याला मूर्त रूप देत त्यांनी फवारणीसाठी भले मोठे ड्रोन उपलब्धकेलेआहे.

# दिखावा नाही, सेवा हवी आदित्य रावळ यांनी वाढदिवस साजरा केला समाजसेवेच्या आगळ्या धर्तीवर!

जनसंचलन/मलकापूर



आजच्या युगात वाढदिवस म्हटले की मोठे बॅनर, पोस्टर, फटाके, महागड्या पार्ट्या आणि सोशल मीडियावरील दिखाव्याची चढाओढ हेच चित्र सर्वत्र दिसते. मात्र या चकचकीत संस्कृतीला छेद देत, समाजात संवेदनशीलतेचा नवा आदर्श प्रस्थापित करत शहरातील तरुण आदित्य रावळ यांनी आपला वाढदिवस पूर्णतः वेगळ्या आणि अर्थपूर्ण पद्धतीने साजरा केला. बॅनर, जाहिराती, फटाके आणि पार्टी यांवरचा खर्च टाळून आदित्य रावळ यांनी त्या रकमेतून १०० हून अधिक गरजू दिव्यांग बांधवांना व्हीलचेअर, कुबड्या, वॉकर यांसारख्या आवश्यक वस्तूंचे वाटप केले. शहरातील विविध भागांतील दिव्यांग लाभार्थ्यांना ही मदत दिली गेली. या उपक्रमामुळे अनेकांच्या चेहऱ्यावर आनंद आणि समाधान फुलले. हा उपक्रम कोणत्याही गाजावाज्याविना, प्रामाणिक समाजभावनेतून पार पडला. आदित्य रावळ यांनी सांगितले की, ङ्खवाढदिवसाचा आनंद केक कापण्यात नाही, तर तो गरजूंच्या चेहऱ्यावर हास्य आणण्यात आहे. निरर्थक खर्च न करता जर कोणाच्या जीवनात थोडासा आधार देता आला, तर तोच सर्वात मोठा आनंद आहे.फ्फ त्यांच्या या संवेदनशील विचारांना नागरिकांनी दाद दिली असून शहरात त्यांच्या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. अनेकांनी या उपक्रमाला ङ्खदिखाव्यापेक्षा संवेदनशीलतेचा विजयफ्फ असे संबोधले आहे. अशा प्रकारे १०० हून अधिक दिव्यांगांना मदतीचा हात देत वाढदिवसाचा खरा अर्थ अधोरेखित करणारा हा उपक्रम तरुण पिढीसाठी प्रेरणादायी ठरला आहे. समाजात सकारात्मकता आणि माणुसकीचा संदेश देणारा हा वाढदिवस साजरा आदित्य रावळ यांच्या नावाने कायम लक्षात राहील.

# बुलढाण्याचा अभिमान! सोहम आसोले याची एनडीए १५५ कोर्ससाठी निवड

## भारतीय वायुदलाच्या फ्लाईंग ब्रांचमध्ये करणार सेवा!


जनसंचलन/बुलडाणा



बुलढाणा (हॅलो बुलढाणा) जिल्ह्याच्या भूमीला अभिमान वाटावा अशी कामगिरी सोहम अतुल आसोले या तरुणाने साध्य केली आहे. राष्ट्रीय सुरक्षा प्रबोधिनी (एनडीए) च्या १५५ व्या कोर्ससाठी त्याची निवड झाली असून त्याने भारतामध्ये ८२ वा क्रमांक (रँक) मिळवून बुलढाण्याचा गौरव वाढवला आहे. १४ सप्टेंबर २०२५ रोजी झालेल्या (१) २०२५ परीक्षेत सोहमने नेत्रदीपक यश मिळवत अंतिम गुणवत्ता यादीत स्थान मिळवले आहे. विशेष म्हणजे, त्याची निवड भारतीय वायुदलाच्या () फ्लाईंग ब्रांचसाठी झाली आहे.लहानपणा पासूनच पायलट बनण्याचे स्वप्न डोळ्यांत बाळगलेल्या सोहमने अथक परिश्रम, शिस्त आणि दृढ निश्चयाच्या जोरावर ते स्वप्न साकार केले आहे. सोहम हा बुलढाणा जिल्ह्यातील सर्वसामान्य कुटुंबातील मुलगा असून त्याचे वडील अतुल आसोले हे शिक्षक म्हणून छत्रपती शाहू महाराज विद्यालय, पेनटाकळी येथे कार्यरत आहेत. कुटुंबातील आधार, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पुण्यातील यशोतेज अकॅडमी येथील प्रशिक्षण यामुळेच हे यश शक्य झाल्याचे सोहमने नमूद केले. त्याच्या या उल्लेखनीय यशामुळे संपूर्ण बुलढाणा जिल्हा अभिमानाने उजळला आहे. मेहनत, चिकाटी आणि जिद्द यांच्या जोरावर कुणीही आपले स्वप्न साकार करू शकते, हे सोहमने आपल्या कार्यातून सिद्ध करून दाखवले आहे

# आशा व गटप्रवर्तकांचे काम दखल पात्र असून त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार-आमदार सिद्धार्थ खरात

जनसंचलन/बुलढाणा



आशा वर्कर्स व गटप्रवर्तकांचे काम दखल पात्र असून त्यांच्या कामाची दखल पाहिजे त्या प्रमाणात सरकार घेताना दिसत नाही. मोबदला मिळण्यासाठी त्यांना अनेक जाचक अटी शर्थीचा त्यांना सामना करावा लागतो. हा अडथळा दूर करून त्यांना शासनाने कर्मचाऱ्यांचा दर्जा देऊन त्यांचे सेवेत समायोजन करावे. यासाठी शासनाकडे येणाऱ्या काळात पाठपुरावा करणार असल्याचे मत मेहकर विधानसभेचे आमदार सिद्धार्थ खरात यांनी सीटू संलग्न आशा व गटप्रवर्तक संघटनेच्या चौथ्या जिल्हा अधिवेशनात प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना व्यक्त केले.

सिटूचे जिल्हा अध्यक्ष कॉम्रेड पंजाबराव गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली आशा व गटप्रवर्तक संघटनेचे ४थे जिल्हा अधिवेशन दिनांक १२ ऑक्टोबर २०२५ रोजी कृषी वैभव लॉन्स मेहकर येथे संपन्न झाले. अधिवेशनाची सूरूवात ध्वजारोहण करून करण्यात आली.तसेच गेल्या तीन वर्षात सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय विविध क्षेत्रात अतुलणिय कार्य करणारे जे महान व्यक्ती वेगवेगळ्या कारणांनी मृत्युमुखी पडले. देशाच्या संरक्षण करतांना सीमेवर जे जवान शहिद झाले. त्या सर्वांना तसेच पुरोगामी चळवळीतील महापुरूषांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. अधिवेशनात संघटनेच्या गेल्या तीन वर्षाचा आंदोलनात्मक व संघटनात्मक अहवाल संघटनेच्या सचिव जयश्रीताई तायडे यांनी मांडला. आणि जमा खर्चाचा आर्थिक अहवाल कोषाध्यक्ष ललिता बोदडे यांनी मांडला.तसेच संघटनेच्या पुढील आंदोलनाची दिशा ठरवण्यात आली या अधिवेशनाचे प्रास्ताविक कॉम्रेड पंजाबराव गायकवाड यांनी केले. या अधिवेशनाला राज्य फ ेडरेशनच्या अध्यक्ष कॉ. आनंदी अवघडे, कोषाध्यक्ष अर्चना घूगरे, साहित्यिक सुरेश साबळे, अंगणवाडी कर्मचारी संघटनेच्या राज्य उपाध्यक्ष तथा जिल्हा सचिव प्रतिभा पाटील यांनी या अधिवेशनाच्या निमित्ताने आपले मनोगत व्यक्त केले व अधिवेशनाला शुभेच्छा दिल्या. यावेळी मंचकावर,माजी नगराध्यक्ष किशोर गारोळे, रश्मी दुबे, ललिता बोदडे, शितल देशमुख, मंदा मसाळ, कविता चव्हाण,इत्यादींची प्रमुख उपस्थिती होती. या अधिवेशनाच्या उद्घाटन समारंभाचे सूत्रसंचालन जयश्री तायडे आणि सुलोचना गाडेकर यांनी केले.

अधिवेशन यशस्वी करण्यासाठी श्रीकिसन मानवतकर, रफिक भाई कुरेशी,आकाश घोडे, बेबी नंदा अंभोरे,हर्षा घायाळ,बालीताई धायडे, सुलोचना गाडेकर जयश्री तायडे,वर्षा शेळके, शारदा अंभोरे, शालीनी गवई, माया वानखेडे, संगीता वानखेडे, आशा पनाड, सुनिता सरदार इत्यादी सह अनेकांनी अथक परिश्रम घेतले.शेवटी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन मंगला काकडे यांनी मानले.

# आंटी घरातच चालवत होती कुंटणखाना!




जनसंचलन/बुलढाणा

एलसीबीने मोठी कारवाई करत शहरातील एका घरात कुंटणखाना चालवणाऱ्या आंटीवर कारवाई केली आहे. घरात सुरु असलेल्या कुंटणखाण्याची पोलिसांना माहिती मिळाली. त्यामुळे स्थागुशाच्या पोलिस पथकाने रविवारी सायंकाळी छापा मारत ही कारवाई केली आहे. दरम्यान यावेळी करण्यात आलेल्या कारवाईत एका आंटीला ताब्यात घेऊन, दोन पीडित महिलांची सुटका करण्यात आली आहे. एक महिला पैशाचे आमिष दाखवून बाहेरगावाहून अर्थात जबलपूर व भिलाई येथून महिलांना बोलावून घेत आपल्या राहत्या घरातच देहविक्री व्यवसाय चालवत असल्याची माहिती पोलिसांना खबऱ्याकडून मिळाली होती.या कुंटणखान्यातून बक्कळ पैसा मिळविण्याचा उद्देश होता.गुन्हे शाखेच्या पथकाने पंचनामा केला असून, साक्षीदारांच्या अहवालानुसार कुंटणखाना चालविणाऱ्या महिलेवर व ग्राहकाविरुद्ध कडक कारवाई केली जाणार आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====

संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८